बातमीपत्र

**पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर**

**माहिती कक्ष, दि ०३ जानेवारी २०२६**

# जेलरोड पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ०५/२०२६ भा.न्या.सहिता क १०३,१०९,१८९(१),१८९(२),१९०,१९१(२),१९१(३),४९,३५२,३५१(२),आर्म ॲक्ट ४/२५ मपोकाक १३५ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि ०२/०१/२०२६ रोजी १३.०० वा ते १६.४५ वा चे सुमारास जोशी गल्ली सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०२/०१/२०२६ रोजी २३.१५ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | बाजीराव पांडुरंग सरवदे,वय-२५ वर्षे,रा-१७/१ जोशी गल्ली रविवार पेठ सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) अमर शंकर शिंदे,२) विशाल शंकर शिंदे ३) अतिश शंकर शिंदे ४) सुनिल शंकर शिंदे ५)राहुल राजु सरवदे ६) ईश्वर सिध्देश्वर शिंदे ७) रोहित राजू सरवदे ८)तानाजी बापू शिंदे ९) महेश शिवाजी भोसले १०) शंकर बाबू शिंदे ११) अनिल शंकर शिंदे १२) शालन शंकर शिंदे १३) शारदा तानाजी शिंदे १४) आलोक तानाजी शिंदे १५) विशाल ऊर्फ दादू संजय दोरकर रा सर्व सोलापूर |
| **मयताचे नाव** | | बाळासाहेब पांडुरंग सरवदे,वय-३६ वर्षे,रा १७/१ जोशी गल्ली रविवार पेठ सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, दि ०२/०१/२०२६ रोजी १३.०० वा ते १६.४५ वा च्या दरम्यान यातील अरोपी क्र १२,१०,०४,१५ असे मिळून फिर्यादीचे राहते घरी येवून आमच्या विरोधात तुम्ही निवडणुकीत उभे राहू नका तुमचा अपक्ष फॉर्म काढून घ्या तुम्हाला गल्लीत राहावयाचे आहे ना तुम्ही अर्ज फॉर्म काढुन घेतला नाहीतर तुम्हाला बघुन घेतो असे म्हणुन धमकी दिली होती परंतु त्यांचे बोलण्याकडे दुर्लक्ष करून गल्लीत वाद नको म्हणून फिर्यादी चे वहीणीने त्याचे नावे भरलेला फॉर्म सोलापूर महानगरपालिका येथून काढून घेतला होता त्यांनतर फिर्यादी चा भाऊ बाळासाहेब आदित्य असे आरोपी शंकर शिंदे यांचे घराशेजारी हनुमान मंदिर जवळ थांबलेले असताना त्यावेळी आरोपी क्र १ व ६ यांनी आरेआरावीची भाषा करून भांडण करत असताना अरोपी क्र १० यांनी आज यांना जिवंत सोडायचे नाही यांना लय मस्ती आली आहे असे बोलले असता त्यावेळी आरोपी क्र ८,२,१४,१५ यांनी तलवार व कोयते घेवून येवून त्यावेळी आरोपी क्र १२,१३ यांनी जवळ येवून फिर्यादीस कळायचे आत भाऊ बाळासाहेब यांचे डोळयात चटणी टाकली त्यावेळी त्याला काही दिसत नसल्याचा फायदा घेत अरोपी क्र ५ , ४ यांनी |

| | | |
|---|---|---|
| | | भावाचे हात पकडून याला आज सोडायचे नाही त्यावेळी आरोपी क्र ८ यांनी भाऊ यातील मयत यांचे छातीवर डाव्या बाजूला हातातील तलवारीने वार केला तसेच अरोपी क्र १५ यांने तलवारीने भावाचे छातीवर उजव्या बाजूला वार करून त्यास गंभीर जखमी केले त्यावेळी फिर्यादी चा पुतण्या आदित्य सरवदे असे मिळून भावास वाचविण्याचा प्रयत्न करीत असताना आरोपी क्र १४, १५ यांनी शिवीगाळ करून हाताने लाथाबुक्यांनी मारहाण केली म्हणून. तपास:- पोनि बिराजदार- **८२७५०४६१०४** |

# सलगरवस्ती पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ०२/२०२६ भा.न्या.सहिता क२८१,१२५(अ)(ब),३२४(४),सह मोवाकाक १३४(अ)(ब) १८४ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि २४/१२/२०२५ रोजी १८.३० वा चे सुमारास बीएम आयटी कॉलेज समोर सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०२/०१/२०२६ रोजी १८.५७ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | चैतन्य आनंद केशपागा,वय-२१ वर्षे,रा-१२७ मोदीखाना सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | रिक्षा क्र एमएच १३ सी टी २५२९ चा अज्ञात चालक |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी व त्यांचा मित्र अस्फर शेख असे मिळून मो.सायकल क्र एमएच १३ ई झेड ०१५४ यावरून घरी परत जात असताना नमुद ठिकाणी आले असता रिक्षा क्र एमएच १३ सी टी २५२९ चा अज्ञात चालक याने त्यांचे ताब्यतील रिक्षा भरधाव वेगाने निष्काळजीपणाने चालवून फिर्यादीचे दुचाकीस समोरून धडक देवून फिर्यादी व मित्र यास गंभीर जखमी होणेस कारणीभूत झाला व तेथून रिक्षा घेवून निघून गेला व दुचाकीचे नुकसान केले आहे.म्हणून. तपास:- पोह/१७१/वाल्मिकी-८८८८५५५१५५ |